# तहसिल कार्यालय,सिंदखेड राजा.

संकलन : तलाठी आस्थापना

दुरध्वनी क्र.07269 234236
e-mail : tahsildarsraja@gmail.com

जा.क्र./म.स./त.आ./कावि/487 /2023

दि. 25/09/2023

## जाहिरनामा

**विषय** :- कोतवाल संवर्गातील आरक्षणानुसार रिक्त पदे भरण्याबाबत..

**संदर्भ** :- मा.जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे आदेश क्र.कावि/त.आ./कक्ष-५/२३०/२३. दि. १५/०९/२०२३.

*****

उपरोक्त संदर्भीय आदेशाचे अनुषंगाने सर्व संबंधीत उमेदवारांना याव्दारे सूचित करण्यात येते की, सिंदखेडराजा तालुक्या अंतर्गत खालील साझ्याच्या नावासमोर प्रवर्ग दर्शविल्याप्रमाणे साझाकरीता कोतवाल पदासाठी अर्ज मार्गविण्यात येत आहे. या साझामध्ये त्यांचे नावासमोरील रकान्यात दर्शविल्याप्रमाणे गावांचा समावेश आहे. त्याकरीता खालील पात्रतेच्या उमेदवारांकडून दिनांक ०६/१०/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा जि. बुलढाणा या कार्यालयात अर्ज मुदतीच्या आत उमेदवाराने व्यक्तीशः सादर करावा. **विलंबाने प्राप्त झालेल्या तसेच यापुर्वी पाठविलेल्या परंतु विहीत वेळेत प्राप्त न झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

अर्ज भरुन देताना अर्जासोबत खुल्या प्रवर्गाचे जागेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास **परीक्षा शुल्क रु.५००/- (अक्षरी : पाचशे रुपये)** व आरक्षित जागेकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारास **परीक्षा शुल्क रु.२५०/- (अक्षरी- दोनशे पन्नास रुपये)** रोख स्वरुपात तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा जि. बुलढाणा येथे जमा करुन पावती अर्जासोबत जोडावी. (अर्ज अपात्र झाल्यास किंवा उमेदवाराची निवड न झाल्यास कोणत्याही उमेदवारास भरणा केलेले परीक्षा शुल्क परत दिल्या जाणार नाही)

| अ.क्र. | प्रवर्ग निहाय आरक्षण | रिक्त असलेल्या साझ्याचे नाव | साझ्याचे अधिनस्त असलेले गाव |
|---|---|---|---|
| १ | अ.जा. (महिला) | विझोरा | विझोरा,शेलगांव राऊत, सारखेड |
| २ | अ.जा. | जऊळका | जऊळका,ताडशिवणी, पिंपळगांव कुडा |
| ३ | वि.जा.(अ) | खेरव | खेरव,वाकद जहां. वाघळुद |
| ४ | इ.मा.व. | साखरखेर्डा भाग-१ | साखरखेर्डा |
| ५ | आ.दू.दु.घ. (EWS) महिला) | दुसरबीड | दुसरबीड |
| ६ | ई.डब्ल्यू.एस. (EWS) | मलकापूर पांग्रा भाग-१ | मलकापूर पांग्रा, वर्दडी खु. |
| ७ | खुला (महिला) | पळसखेड चक्का | पळसखेड चक्का, पिंपळखुटा, जळगांव |
| ८ | खुला (महिला) | झोटिंगा | झोटिंगा, आगेफळ |
| ९ | खुला | गुंज | गुंज, वरूडी, शेवगा जहां., एकांबा |
| १० | खुला | दरेगांव | दरेगांव, नागझरी |
| ११ | खुला | देऊळगांव कोळ | देऊळगांव कोळ,कुंबेफळ, कोनाटी |
| १२ | खुला | शेंदुर्जन भाग-२ | शेंदुर्जन |
| १३ | खुला | सिंदखेडराजा भाग-१ | सिंदखेडराजा, उगला |
| १४ | खुला | कंडारी | कंडारी,भंडारी, जागदरी, आंबेगांव |

तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा जि.बुलडाणा

❖ **कोतवाल पदाकरींता उमेदवार खालील अटीस पात्र असावा**

१. उमेदवार शारिरीक दृष्ट्या सुदृढ असावा.

२. दिनांक २५/०९/२०२३ रोजी वय १८ वर्षापेक्षा कमी व ४० वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. अर्जदार संबंधीत तलाठी साझा अंतर्गतचा रहिवासी असावा.

४. अर्जदार किमान इयत्ता चौथी (४) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

५. मागास प्रवर्गातील उमेदवाराने जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर वरील अर्हता दिनांका पुर्वीचे जोडणे आवश्यक राहील.

६. दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण प्राप्त झाल्यास अशा उमेदवारांना गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि.4 मे 2022 मधील नमुद निकषावर निश्चित करण्यात येईल.

७.कोतवाल या पदावर नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असेल.

८. उमेदवाराचे शारिरीक व मानसिक आरोग्य उत्तम असावे. कोतवाल पदासाठी नियुक्त झालेल्या उमेदवारांनी नियुक्ती नंतर १ महीन्याचे आत जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे शारिरीक तंदुरुस्ती बाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

९. उमेदवारावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा / शिक्षा दाखल झालेला नसावा. कोतवाल पदासाठी नियुक्त झालेल्या उमेदवारांनी नियुक्ती नंतर १ महिन्यात संबंधित पोलीस विभागाचे चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

❖ **अर्ज करण्याची पध्दत**

१. अर्ज हा विहीत नमुन्यात असावा.

२. विहीत नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय,सिंदखेडराजा जि. बुलढाणा येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

३. विहीत नमुन्यातील अर्जाकरिता अर्ज शुल्क रुपये ५०/- रोख स्वरुपात भरावे लागेल.

४. अर्ज सादर करतांना अर्जास रुपये १०/- कोर्ट फी स्टॅम्प चिटकवणे बंधनकारक राहील.

५. जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत अर्जासोबत जोडावी तसेच उन्नत व प्रगत (क्रिमीलेअर) गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (किमान ३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असलेले) मागासवर्गीय उमेदवारास अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.( अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती उमेदवार वगळून)

६. उमेदवाराने पूर्ण भरलेला अर्ज शैक्षणिक पात्रता / जातीचे प्रमाणपत्र इत्यादी विहीत नमुन्यात भरुन तहसीलदार तथा सदस्य सचिव, तालुका निवड समिती, तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा जि. बुलडाणा येथे दि.०६/१०/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष अर्ज सादर करावा.विहीत वेळेनंतर व मुदतीनंतर कोणत्याही प्रकारचा अर्ज स्वीकारला जाणार नाही. कोणीही पोस्टामार्फत किंवा कुरीअर मार्फत अर्ज पाठवू नये. पाठविल्यास सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही व कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. याबाबत सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

७. सर्व पात्र उमेदवारांनी त्यांचे प्रवेशपत्र दि. १२/१०/२०२३ रोजी कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा येथे येऊन घेऊन जावे.

❖ **कोतवाल पदाकरिता अर्ज सादर करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

१. इयत्ता चौथी उत्तीर्ण गुणपत्रिका किंवा महत्तम प्राप्त शैक्षणिक गुणवत्ता दर्शवणारी गुणपत्रिका.

२. शाळा सोडण्याचा दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र.

३. साझातील रहिवासी असल्याबाबत तलाठी / सरपंच / ग्रामसेवक यांचा रहीवास दाखला.

४ तहसीलदार यांचा अधिवास दाखला (Domicile Certificate)

५. मागास वर्गाकरीता (SC/ST प्रवर्गाव्यतिरिक्त) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र (नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र)

६. कोतवालाचे वारसदार असल्यास त्याबाबत तहसीलदार यांचे प्रमाणपत्र.

७. विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र.

८. मागासवर्गीय उमेदवारांनी उपजिल्हाधिकारी दर्जाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती नंतर सहा (६) महिन्यांचे आत सादर करणे बंधनकारक राहील.

९. उमेदवार मागासवर्गीय असल्यास त्यांची जात प्रवर्गाचे मुळ जात प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणेबंधनकारक राहील. तसेच शासन निर्णय क्रमांक बी.सी.सी.२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ ब/ दिनांक १२/१२/२०११ अन्वये उपस्थित उमेदवाराच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा (६) महिण्याच्या आत सादर करावयाच्या अटिवर बंधपत्र/ शपथ पत्र लिहून घेतल्यानंतर विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०. आर्थिक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्गात (EWS) अर्ज सादर करणाऱ्या उमेदवाराने तहसिलदार यांचे राज्य शासनाचे विहीत नमुन्यातील EWS प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. (दि.३१ मार्च २०२४ पर्यंत वैध असलेले)

११. सर्व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकीत प्रतीअर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्र सादर करु नये.

❖ **कोतवाल पदाकरीता निवडीची पध्दत.**

१. कोतवाल संवर्गाची पदे नामनिर्देशने भरतांना १०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.

२. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे ५० प्रश्न राहतील. त्यानुसार सदर लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांचे आधारे निवडसुचीत तयार करुन निवडसुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

३. उमेदवारास नियुक्तीसाठी लेखी परीक्षेमध्ये किमान २० गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील.

४. कोतवाल पदासाठीची प्रतिक्षा अंतिम निकालाच्या दिनांकापासुन एक वर्ष वैध राहील नंतर सदर प्रतिक्षा यादी व्यपगत होईल.

❖ **कोतवाल भरतीचा कालबध्द कार्यक्रम**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहिरनामा प्रसिध्द करणे | दि.२५/०९/२०२३ |
| २ | उमेदवारांचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दि.०६/१०/२०२३ |
| ३ | अर्जाची छाननी करुन पात्र/अपात्र उमेदवारांची यादी गाव निहाय तयार करुन प्रसिध्द करणे | दि. ०९/१०/२०२३ |
| ४ | आक्षेप मागविणे | दि.११/१०/२०२३ सायंकाळी ४.०० वा. पर्यंत |
| ५ | आक्षेप निकाली काढून परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविणे | दि.१२/१०/२०२३ |
| ६ | लेखी परीक्षेचा दिनांक | दि.२२/१०/२०२३ (रविवार) स.११.०० ते दु.१२.३० पर्यंत |
| ७ | प्राथमिक उत्तरतालिका प्रसिध्द करणे व अंतिम करणे | दि. २३/१०/२०२३ |
| ८ | अंतिम उत्तरतालिका आधारे उत्तरपत्रिका तपासणी करणे | दि.२५/१०/२०२३ |
| ९ | प्रारुप निकाल (प्रारुप निवड यादी व प्रतिक्षा यादी) प्रसिध्द करणे | दि.२६/१०/२०२३ |
| १० | प्रारुप निकालावर आक्षेप नोंदविणे, आक्षेप निकाली काढणे | प्रारुप निकाल प्रसिध्दी पासून दि.२७/१०/२०२३ सायंकाळी ५.०० वा.पर्यंत |
| ११ | अंतिम निकाल (अं तिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे) | दि. ३०/१०/२०२३ |
| १२ | निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करणे | दि.३१/१०/२०२३ |
| १३ | जिल्हाधिकारी कार्यालयास अंतिम अहवाल सादर करणे | दि.०१/११/२०२३ |

कोतवाल भरती संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा यांचे राहतील. तसेच पात्रतेच्या दृष्टीकोनातुन अंतिम निवड करण्याचे अधिकार अध्यक्ष कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहे.

(सचिन जैस्वाल)
**सदस्य सचिव**
**कोतवाल निवड समिती सिंदखेडराजा**
**तथा तहसीलदार,सिंदखेडराजा**

**प्रतिलिपी:-**

१. मा. जिल्हाधिकारी, बुलढाणा (आस्थापणा विभाग) यांना माहिती करीता सविनय सादर.
२. मा. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी NIC जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा कृपया सदर जाहीरनाम जिल्हयाचा वेबसाईटवर प्रसिध्द करावा.
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिंदखेडराजा.
सदर जाहिरनामा पंचायत समिती कार्यालय, सिंदखेडराजाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येऊन् प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.
४. मुख्याधिकारी,नगर परिषद, सिंदखेडराजा.
सदर जाहिरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येऊन प्रसिध्दी अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.
५. तलाठी ---------------------- ता.सिंदखेडराजा जि.बुलढाणा.
सदर जाहिरनामा साझा अंतर्गत येणाऱ्या सर्व गावातील तलाठी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.
६. सचिव ग्रामपंचायत ---------------- ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा.
सदर जाहिरनामा आपले अधिनस्त ग्राम पंचायत कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.
७. नायब नाझर,तहसिल कार्यालय सिंदखेडराजा.
सदर जाहिरनामा या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

(सचिन जैस्वाल)
**सदस्य सचिव**
**कोतवाल निवड समिती,सिंदखेडराजा**
**तथा तहसीलदार,सिंदखेडराजा.**

तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा
जि. बुलडाणा